दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक १११ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२१ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# ओबीसींना राजकीय आरक्षण मिळाले

## बांठिया आयोगाच्या अहवालानुसार निवडणुका घेण्याचे कोर्टाचे आदेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकीतील ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. सुप्रीम कोर्टानं आज बाठिंया आयोगाचा अहवाल मान्य केला असून या अहवालानुसार निवडणुका घेण्याचे निर्देश कोर्टानं राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. याशिवाय राज्यात रखडलेल्या निवडणुका तातडीनं घेण्यासंदर्भात पावलं उचलण्यासही कोर्टानं सांगितलं आहे. येत्या दोन आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर करा, असे आदेश दिले आहेत.



जयंतकुमार बाठिंया आयोगाने त्यांच्या अहवालामध्ये ओबीसांनी स्थानिक स्वराज संस्थांमध्ये २७ टक्के पर्यंत आरक्षण देण्यात यावे अशी शिफारस केली होती. कोर्टानं हा अहवाल मान्य केल्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींना २७ टक्के राजकीय आरक्षण मिळणार आहे.

राज्यात ९२ महानगरपालिका आणि ४ नगरपंचायतीच्या निवडणुका रखडल्या आहेत. या निवडणुकी संदर्भातील कार्यक्रम येत्या दोन आठवड्यात जाहीर करण्याच्याही सूचना सुप्रीम कोर्टानं दिल्या आहेत. त्यामुळे ओबीसींच्या राजकीय आरक्षणाची कोंडी फुटल्याचं म्हटलं जात आहे.

बांठिया आयोगाने ओबीसी समाजाला राजकीय आरक्षण देताना लोकसंख्येच्या प्रमाणात ते देण्यात यावे असे आयोगाने म्हटले आहे. ओबीसी राजकीय आरक्षण देताना ५० टक्के मर्यादा ओलांडली जाणार नाही याची दक्षता घ्यावी, असे म्हटले आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आरक्षणाला धक्का न लावता ५० टक्के मर्यादेत ओबीसी आरक्षण द्यावे, अशी शिफारस बांठिया आयोगाने केली आहे. बांठिया आयोगाने हा अहवाल राज्य सरकारकडे ७ जुलै रोजी सादर केला होता.

बांठिया आयोगाच्या शिफारसीनुसार, ओबीसी राजकीय आरक्षण लागू करण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिल्यास ओबीसी प्रवर्गातील लोकप्रतिनिधींना महापालिका, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायतीच्या प्रमुख पद-ावर काम करण्याची संधी मिळेल. राज्यात ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या, २४१ नगरपालिका, २७ महापालिका, १२८ नगरपंचायती आणि २७८३१ ग्रामपंचायती आहेत.

ओबीसी राजकीय आरक्षण लागू झाल्यास महापालिकांमध्ये बांठिया आयोगानुसार २६ टक्के आरक्षणाप्रमाणे ७ महापालिकांचे महापौर पद ओबीसी प्रवर्गातील लोकप्रतिनिधीला मिळेल. राज्यातील २४१ नगरपालिकांपैकी २७ टक्के ओबीसी आरक्षणाप्रमाणे ६६ नगरपालिकांचे नगराध्यक्षपद ओबीसी प्रवर्गासाठी राखीव होईल. १२८ नगरपंचायतीपैकी ३७ ठिकाणी ओबीसी प्रवर्गासाठी अध्यक्षपद राखीव असेल. नगरपंचायतीमध्ये देखील ओबीसींना २७ टक्के आरक्षण मिळेल.

# खोपटा-कोप्रोली रस्त्यावर जीव घेणे खड्डे व साईट पट्ट्या

## सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



**दै.रायगड नगरी । उरण**

रस्त्याच्या नित्कृष्ठ दर्जाच्या कामामुळे खोपटा - कोप्रोली रस्त्यावर सध्या पावसाळ्यात जीव घेणे खड्डे व साईट पट्ट्या निर्माण झाल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग उरण व एन.एच.ऐ.आय. यांनी सदर रस्त्याच्या खड्ड्यांकडे लक्ष केंद्रित न केल्यास प्रवाशी वाहनांना अपघात होण्याचा व प्रवाशी नागरीकांच्या जिवीतास धोका निर्माण होऊ शकतो अशी भिंती वाहन चालक व्यक्त करत आहेत.

उरण पुर्व विभागातील बांधपाडा (खोपटा), कोप्रोली, पिरकोन, आवरे, गोवठणे, वशेणी, पाले, मोठी जुई, कळंबुसरे, चिरनेर, आदि ग्रामपंचायत हद्दीतील गावांना जोडणारा तसेच पनवेल, पेण, अलिबाग तालुक्यातील गावांना जोडणारा खोपटा - कोप्रोली हा महत्त्वाचा रस्त्ता आहे. या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था होत असल्याने आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून खोपटा- कोप्रोली - चिरनेर रस्त्याचे मजबूतीकर करण्यासाठी एन.एच. ऐ.आय कडून २०२१-२२ साली सुमारे ३ कोटी ७५ लाखांचा निधी मंजूर करुन घेतला. सदर मंजूर करण्यात आलेला निधी एन.एच.ऐ.आय. विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग ही करुन घेतला.

खोपटा- कोप्रोली- चिरनेर या ६ कि.मी. लांबीच्या रस्त्त्याच्या मजबूती करण्यासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रथमच निधी आमदार महेश बालदी यांनी उपलब्ध करून दिल्याने पुर्व विभागातील जनतेने आमदार महेश बालदी यांचे आभार व्यक्त करत बॅनर लावले होते. परंतु एन.एच.ऐ.आय.कडून मंजूर करण्यात आलेल्या सुमारे ३ कोटी ७५ लाखांच्या निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी नियुक्ती केलेल्या ठेकेदारांनी उत्तम दर्जाचे डांबरीकरण व साईट पट्ट्यांचे काम न करता सदर रस्त्यावर अत्यंत निकुष्ठ दर्जाचे डांबरीकरण करण्याचे काम केले. त्यामुळे काही दिवसांतच सदर रस्त्त्याची दुरवस्था झाली. प्रवाशी नागरीकांनी या रस्त्याच्या दुरावस्थेसंदर्भात नाराजी व्यक्त केल्याने, संबंधित ठेकेदारांनी मे २०२२ मध्ये पुन्हा रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले.

परंतु सार्वजनिक बांधकाम .../२

# फेसबुक वरुन ऑनलाईन कपडे मागवणे महिलेस पडले चांगलेच महागात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

फेसबुक वरुन ऑनलाईन महिलांचे कपडे मागवणे उलवे भागातील महिलेस चांगलेच महागात पडले आहे. सदर प्रकरणात सायबर चोरट्याने कुरीयर कंपनीचा प्रतिनीधी असल्याचे भासवून सदर महिलेने मागविलेले ऑनलाईन कपड्याचे पार्सल रद्द होऊ नये यासाठी तिला ऑनलाईन ५ रुपये पाठविण्यास सांगून त्याद्वारे तिच्या बँक खात्याची माहिती मिळविली. त्यानंतर त्याने सदर महिलेच्या खात्यातून १ लाख ६८ हजार रुपये परस्पर काढून घेतल्याचे उघडकीस आले आहे. न्हावा- शेवा पोलिसांनी या प्रकरणी सायबर चोरट्या विरोधात गुन्ह-ादाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे.

सदर प्रकरणात फसवणूक झालेली ४५ वर्षीय महिला उलवे भागात राहण्यास असून एप्रिल महिन्यामध्ये या महिलेने फेसबुक वरील जाहिरातीतून मिळालेल्या व्हॉटस्अ‍ॅप वरुन ऑनलाईन महिलांचे ड्रेस मटेरीयलचे कपडे मागवले होते. १३०० रुपये फोन पे द्वारे पाठवून दिल्यानंतर तीन दिवसामध्ये त्यांच्या कपड्याचे पार्सल कुरीयरद्वारे घरपोच मिळाले होते. त्यामुळे जून महिन्यामध्ये या महिलेने पुन्हा त्याच व्हॉटस्अ‍ॅप वरुन चॅट करुन ९५० रुपये किंमतीचे ड्रेस मटेरियलचे कपडे मागविले होते. त्याचे पैसे देखील त्यांनी ऑनलाईन पाठवून दिले होते. त्यानंतर या महिलेने ८०० रुपये पाठवून आणखी एक ड्रेस मटेरियल मागविले होते. या ड्रेस मटेरियलचे पार्सल पाठवण्यात आल्याचा मेसेज तक्रारदार महिलेला तत्काळ मिळाला. मात्र, दोन दिवसा-पूर्वी मागविलेल्या पार्सलबाबत मेसेज न आल्याने त्याची माहिती घेण्यासाठी या महिलेने मारुती कुरीयरचे गुगलद्वारे ट्रॅक करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर एका सायबर चोरट्याने मारुती कुरीयर कंपनीचा प्रतिनीधी असल्याचे भासवून या महिलेला संपर्क साधला. तसेच त्यांनी ऑनलाईन मारुती कुरीयर ट्रॅक केल्यामुळे त्यांच्या पार्सलचे कुरीयर डीक्टीवेट झाल्याचे सांगून ते अ‍ॅक्टीवेट करण्यासाठी ५ रुपये पाठविण्यासाठी युपीआय क्रमांक पाठवून दिला.

त्यामुळे सायबर चोरट्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून या महिलेने ५ रुपये पेटीएमद्वारे .../२

# अरुंद रस्त्यामुळे होत आहेत अपघात

## खाजणी - घोसाळा रस्ता रुंदीकरण करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड - भालगाव - रोहा मार्गावर अरुंद रस्त्यामुळे अपघात होत आहेत. अपघातानंतर वाहतूक कोंडी होत आहे. प्रवाशांना व वाहनांना तासनतास अडकून राहावे लागत आहे. त्यामुळे हा रस्ता रुंदीकरण करण्यात यावा अशी मागणी वाहन चालकांनी व स्थानिकांनी केली आहे.

मुरुड भालगाव रोहा मार्गावर खाजणी ते घोसाळा हा सुमारे १० कि.मी. चा रस्ता अत्यंत अरुंद आहे. या रस्त्यावर अनेक वळणे आहेत. त्यामुळे या परिसरात एकाच महिन्यात दोनदा मोठे मोठे अपघात होता होता राहिली. दि. १८ जुलै रोजी मुरुड - भालगाव - रोहा एस.टी. मुरुड येथून सकाळी १०:३० वाजता सुटणारी तर रोहा - भालगाव - मुरुड ही रोहा येथून १०:१५ वाजता सुटणारी या दोन्ही गाड्या घोसाळा खाजणी दरम्यान अरुंद रस्त्यामुळे साईड देत असताना रस्त्याच्या साईड पट्ट्या निसरड्या झाल्या असल्यामुळे रोहा - मुरुड एस.टी. बस खचली सुदैवाने कोणालाही इजा झाली नाही. परंतु एस.टी. अडकून पडल्याने सुमारे या मार्गावर दोन तास वाहतूक खोळंबली होती. .../२



## संक्षिप्त...

### जीएसटी घोटाळ्याप्रकरणी एका व्यक्तीस अटक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

खोटी खरेदीची बिजके प्राप्त करून शासनाची करोडो रुपयांची महसूलहानी करणाऱ्या करदाता मे पाकीजा स्टिल एलएलपी चे भागीदार आणि मे मायल स्टिल प्रा.लि. चे संचालक सय्यद तैकीर हसन रिजवी यांनी या प्रकरणामध्ये वस्तूंच्या वा सेवांच्या पुरवठ्याशिवाय ९९.२७ कोटी रुपयांची बनावट बीजके प्राप्त करुन १७.८७ कोटी रुपयांची बनावट वजावट मिळविल्याप्रकरणी सय्यद तैकीर हसन रिजवी या व्यक्तीस महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभागाने करचुकवेगिरी प्रकरणी आज अटक केली आहे.

सय्यद तैकीर हसन रिजवी यांनी मे. पाकीजा स्टिल एलएलपी आणि मे मायल स्टिल प्रा. लि. या दोन बोगस कंपन्यांच्या माध्यमातून सुमारे ९९.२७ कोटी रुपयांची खोटी खरेदीची बिजके प्राप्त केली आहेत. त्यातून या व्यक्तीने शासनाची सुमारे १७.८७ कोटी रुपयांची महसूल हानी केल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले आहे. या प्रकरणामध्ये वस्तू व सेवांचा पुरवठा न करता महाराष्ट्र वस्तू व सेवाकर अधिनियम, २०१७ च्या तरतुदींचे उल्लंघन केले गेले आहे. या व्यक्तीस अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांच्या न्यायालयाने दि. ३ ऑगस्ट २०२२ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात अन्वेषण अधिकारी डॉ. विद्य-ाधर जगताप, सहाय्यक राज्यकर आयुक्त हे मोहन चिखले, राज्यकर उपआयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक तलाव येथे सुरक्षारक्षक नेमून सुरक्षतेचे साहित्य पुरविण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक तलाव येथे सुरक्षारक्षक नेमून सुरक्षतेचे साहित्य पुरविण्याची मागणी पनवेल महानगरपालिका मा. विरोधी पक्षनेता प्रितम म्हात्रे यांनी आयुक्ताकड़े केली आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील असणारे तलाव येथे अनेक नागरिक येत असतात. लहान मुले पाण्यात पोहण्यासाठी तलावात उतरतात. काहीवेळा पोहता न-आल्यामुळे अनेक मुलांना आणि नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. पालिका हद्दीतील तलावांमध्ये सुरक्षिततेचे साहित्य नसल्याने बचाव कार्य करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. तसेच जिवित हानीच्या दुर्घटना होऊ नये या करीता पालिकेच्या प्रत्येक तलाव येथे सुरक्षा रक्षक असणे गरजेचे आहे. गणेशोत्सवास अवघे काही दिवस उरले आहेत. अनेक नागरीक गणपती विसर्जनासाठी जवळच्या तलावात जात असतात. त्यामुळे गणेशोत्सवापूर्वी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करून सुरक्षिततेचे साहित्य पालिका क्षेत्रातील प्रत्येक तलाव येथे पुरविणे गरजेचे आहे. त्यामुले पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक तलाव येथे सुरक्षारक्षक नेमून सुरक्षतेचे साहित्य पुरविण्याची मागणी पन-वेल महानगरपालिका मा. विरोधी पक्षनेता प्रितम म्हात्रे यानी आयुक्ताकड़े केली आहे.



# जनावरांसाठी दफनभूमी, स्मशान भूमी विकसित करा

## मा.विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनावरांसाठी दफनभूमी, स्मशानभूमी विकसित करण्याची मागणी पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी आयुक्ताकड़े केली आहे.

स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेल, निरोगी पनवेल ठेवण्यासाठी आपल्या पालिक क्षेत्रात दफनभूमी, स्मशानभूमी असणे अत्यंत गरजेचे आहे. जनावरांच्या मृत्यू नंतर त्याचे प्रेत उघड्यावर टाकले जाते. त्यामुळे मोठी दुर्गंधी पसरून परिसरात रोगराई वाढत जाते. २००५ साली आलेल्या पुरामुळे हजारो जनावरे मृत पावली होती. त्यानंतर पसरलेल्या दुर्गंधीमुळे हजारो नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले होते. हिंदू धर्मात प्राण्यांना दैवत मानले जाते. अशातच रोगराई, वृद्धापकाळाने किंवा दुर्घटना होऊन मृत पावलेल्या प्राण्यांना उघड्यावर टाकून दिले जाते. हे हिंदू धर्मात आणि मनाला पटत नाही. अशा मृत जनावरांकरिता दफनभूमी, स्मशानभूमी असणे आवश्यक आहे. बैल, म्हैस असे प्राणी पुरताना तेव्हढाच मोठा खड्डा खणून त्यात अर्धा खड्डा मीठ टाकावे लागते. त्यामुळे कोणतीही दुर्गंधी पसरत नाही. त्यामुळे पालिका क्षेत्रात जनावरांना पुरण्यासाठी दफनभूमी, स्मशानभूमी असावी. यामुळे आपला पनवेल स्वच्छ सुंदर आणि निरोगी पनवेल राहील. ह्या उपक्रमामुळे निश्चित पालिकेचे नाव नोंदविले जाईल. सदर बाबतीत कोणता निर्णय घेण्यात येईल याची लेखी माहिती देण्यात यावी. अशी मागणी पनवेल महानगरपालिका माजी विरोधी पक्षनेता प्रितम म्हात्रे यानी आयुक्ताकड़े केली आहे.

# पेण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व जागा जिंकणार : धैर्यशिल पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता पेटून उठला असून आगामी सर्व निवडणुकीत तालुक्यात लालबावटा पुन्हा अभिमानाने फडकविल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही पेण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व जागा शेकाप जिंकणार असल्याचे प्रतिपादन माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी पेण येथे केले



शेतकरी कामगार पक्षाचा ७५ वा वर्धापन दिन वडखळ येथे २ ऑगस्टला साजरा करण्यात येणार असून यानिमित्त पेण येथील कार्यालयात कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली यावेळी माजी आमदार धैर्यशील पाटील, जिल्हा चिटणीस अ‍ॅड. आस्वाद पाटील, शेकाप नेत्या अ‍ॅड. निलिमा पाटील, भाऊ एरणकर, जि.प.सदस्य डी.बी.पाटील, प्रभाकर म्हात्रे, पेण तालुका चिटणीस संजय डंगर, सुरेश खैरे, प्रसाद भोईर, सुरेश पाटील, संदेश ठाकूर, के. डी.पाटील,प्रफुल पाटील, समिर म्हात्रे, शोमर पेणकर, स्वप्निल म्हात्रे, अमित पाटील, काशिनाथ पाटील, दिलीप पाटील, संजय भोईर, मधुकर पाटील, यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षाचा ७५ वा वर्धापन दिन अधिकाधिक ताकदीने तसेच पक्षाला उर्जित अवस्था देण्याच्या मार्गाने साजरा करणार आहोत. .../२

# कुलाबा येथील इमारतींच्या पुनर्विकास कामाला गती द्या : अ‍ॅड. राहुल नार्वेकर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कुलाबा येथील म्हाडा अंतर्गत असलेल्या इमारतींच्या पुनर्विकासामुळे सर्वसामान्य नागरिकांना हक्काची घरे उप-लब्ध होणार आहेत. पुनर्विकासाचे काम मार्गी लागण्यासाठी संरक्षण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र महत्वाचे आहे. त्यामुळे म्हाडा, नगरविकास विभाग, मुंबई महानगरपालिका यांनी संरक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घ्यावी, पुनर्विकासासाठी आवश्यक परवानगी, नाहरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी संबंधित विभागांनी एकत्रितपणे, प्रयत्न करावेत, कुलाबा येथील इमारतींच्या पुनर्विकास कामाला गती द्यावी, तसेच संरक्षण विभागाने देखील यापुढे ना हरकत प्रमाणपत्र नाकारताना कारणमीमांसेसह नाकारावे जेणेकरुन अर्जदारांना योग्य त्या दुरुस्त्या करुन पुन्हा प्रस्ताव सादर करता येतील, असे निर्देश विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर यांनी दिले. यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल येत्या तीन आठवड्यात सादर करण्याचे देखील त्यांनी निर्देशित केले.

कुलाबा येथील इमारत पुनर्विकास कामांसंदर्भात विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी नगरविकास विभागाचे अपर मुख्य .../२

# कर्जत रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी सतीश श्रीखंडे




**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रोटरी क्लबचा पद्ग्रहण समारंभ संपन्न झाला. यामध्ये नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी सतीश श्रीखंडे तर सचिवपदी विशाल शहा यांची निवड करण्यात आली. खजिनदार पदाची जबाबदारी अरविंद जैन यांच्याकडे सोपविण्यात आली.

कर्जत मधील राज कॉटेजच्या सभागृहात रोटरी क्लबच्या पद्ग्रहण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. पुणे येथील अमित जाधव यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रांतपाल अविनाश कोळी, मावळते अध्यक्ष सुनिल सोनी, सचिव सचिन ओसवाल उपस्थित होते.

सुनिल सोनी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सचिन ओसवाल यांनी दृक्श्राव्य पद्धतीने वार्षिक अहवाल सादर केला. जितेंद्र ओसवाल आणि ठकेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर अध्यक्षपदाची सूत्रे सतीश श्रीखंडे तर सचिवपदाची सूत्रे विशाल शहा यांच्याकडे सोपविण्यात आली. यावेळी बोलताना श्रीखंडे यांनी 'शहरा बरोबरच ग्रामीण भागातील समस्या समजून घेऊन. तेथील आरोग्य सुविधा, शैक्षणिक सुविधांचा तसेच तेथील मूलभूत गरजांचा अभ्यास करून त्या सोडविण्याचा प्रयत्न सर्वांना बरोबर घेऊन करीन.' असा शब्द दिला. सुनील सोनी, 'प्रथम स्वतः व्यवस्थित व्हा मग दुसऱ्यांसाठी काम करा. हे पारमार्थिक काम आहे. नवीन माणसे जोडा, नवीन विचार जोडा सर्वांनी मिळून काम करा.' असा सल्ला दिला.

अमित जाधव यांनी 'घर सांभाळण फार अवघड गोष्ट आहे. काम होते ते कधी दिसत नाही. लहानपणी आपण मस्त बिनधास्त बोलायचो, वागायचो मात्र आता आपण जबाबदारीने वागले पाहिजे. दोस्ती मधून खूप चांगली कामे होतात. प्रत्येक जण समाजाला काही तरी देणं लागतो परंतु आपण देत नाही. आपण म्हणतो आपल्याकडे आल्यावर देऊ परंतु ती वेळ कधीच येत नाही. म्हणून वेळ आहे तेंव्हाच सत्कार्य करा. अशा किती गोष्टी आहेत त्या आपण घेऊन चालतो आहोत. सध्या करमणुकीची व्याख्या बदलली आहे. आपण वेळेची करमणूक करू लागलोय. हे बदलले पाहिजे.' असे स्पष्टपणे सांगितले. अविनाश कोळी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन हुसेन जमाली यांनी केले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, डॉ. मनोहर साबणे, डॉ. प्रेमचंद जैन, राहुल वैद्य, दीपक पाटील, दत्तात्रेय श्रीखंडे, प्रभाकर चव्हाण, योगेश राठी, दिपचंद जैन, प्रभाकर बडेकर, सूर्याजी ठाणगे, साईनाथ श्रीखंडे, ज्ञानेश्वर कडू, सुमित बैलमारे, स्नेहा श्रीखंडे, मुकुंद भागवत, समीर सोहनी आदी उपस्थित होते.

# कुडकी ग्रामपंचायतीला पाणी योजनेसाठी ७९ लाख रुपयांचा निधी मंजूर

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

रायगड लोकसभा खासदार सुनिल तटकरे यांच्या प्रयत्नातून श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील कुडकी या गावाला जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेसाठी ७९ लाख ८३ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत मुख्य अभियंता, पुणे यांचेकडून या गावांच्या कामांना मंजुरी मिळाली होती, हि कामे कार्यान्वित करण्यासाठी रायगफ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची प्रशासकीय मान्यता आवश्यक असते त्यानुसार माजी पालकमंत्री आदिती तटकरे व खासदार सुनील तटकरे तसेच कोकण विधान परिषदेचे आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठपुरावा केला होता त्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कुडकी गावाच्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी प्रशासकीय मंजुरी दिली आहे. कामाची निविदा निघाल्यानंतर हि कामे लवकरच सुरु होणार आहेत.

श्रीवर्धन मतदारसंघाचे अध्यक्ष महंमद मेमन यांच्या हस्ते कुडकी ग्रामपंचायत सरपंच सौ. आदिती अमर आगरी उपसरपंच अरहेमान जहुर घराडे कुडकी कुणबी समाज अध्यक्ष रामचंद्र अनंत आगरी माजी सरपंच मलिका म. काजी व ग्रापंचायत सदस्य व मुस्लिम समाज अध्यक्ष कुणबी समाज अध्यक्ष आधिवासी समाज अध्यक्ष किसन गंगाराम जाधव तसेच आदर्श बौद्धजन सेवा संघ अध्यक्ष अनंत धोंडू तांबे पदाधिकारी याना प्रशासकीय मंजुरीचे पत्र देण्यात आले. यावेळी श्रीवर्धन तालुका राष्ट्रवादी उपाध्यक्ष सचिन किर चिंचबादेवी देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष सुजित पाटील तुकाराम धोंडू आगरी, शांताराम हरीचंद्र आगरी, गोपाळ हरीचंद्र आगरी, रामचंद्र महादेव बामणे, सुशीला शांताराम शिगवण ग्रामपंचायत सदस्य, अजमल अ. गपुर कोकाटे अर्शद पेणकर, नविद कोकाटे, मुसद्दिक सालवारे, नसरीन असिफ सैबोले ग्रामपंचायत सदस्य, सैफुलहक घराडे, समीऊल्ला घराडे, रवींद्र लक्ष्मण आगरी आदी मान्यवर व बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.


मा.एन.आर.इंदलकर सो.कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.गुरुनाथ दत्ता भगत**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी सो. वर्ग १ यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.६०४/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.२४/०८/२०२२

श्री.मनोज कृष्णा काठे
वय : २५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मुक्काम–नितळस, पोस्ट : वावंजे,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक
ग्रामंचायत नितळस
नितळस, पोस्ट : वावंजे,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.मनोज कृष्णा काठे यांचा जन्म दि.२३/०६/१९९६ रोजी मौजे : नितळस, पो.वावंजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे झालेला आहे. तशी जन्माची नोंद होवून मिळण्यासाठी फौजदारी चौकशी अर्ज क्र.६०४/२०२० दाखल केला असून सदरच्या नोंदीबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत घ्यावयाची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास कोणासही काही बोलायचे नसून असे समजून मा.कोर्ट अर्जदाराचे लाभात योग्य तो आदेश देईल याची नोंद घ्यावी.
स्थळ : पनवेल
दिनांक : २०/०७/२०२२

**सही/–** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**


# आपत्ती व्यवस्थापन संचालक पदी आप्पासाहेब धुळाज रुजू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याच्या महसूल व वन विभागातंर्गत आपत्ती व्यवस्थापन संचालक पदी आप्पासाहेब धुळाज रुजू झाले. श्री.धुळाज यांनी यापूर्वी राज्य कामगार विमा योजना आयुक्त म्हणून काम पाहिले असून कोल्हापूर आणि लातूर येथे अपर जिल्हाधिकारी म्हणून काम पाहिले आहे. तसेच नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयात महसूल विभागाचे उपायुक्त म्हणून काम पाहिले आहे.


**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर सूचना**
**विद्युत विभाग**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका मालकीच्या अग्नीशमन इमारत, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, मलनिःस्सारण प्रक्रिया केंद्र, व स्व.विलासराव देशमुख, शॉपिंग कॉम्प्लेक्स या ठिकाणी सोलार यंत्रणा राबविणे कामी अंदाजपत्रक बनविण्याकरिता लागणाऱ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे. सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.
जा.क्र./पमपा/विद्युत/२०२२/प्र.क्र.२३/६२१/२०२२
दिनांक : २०/०७/२०२२

**सही/–**
**विद्युत विभाग प्रमुख**
**पनवेल महानगरपालिका**



श्री.मुजावर सो

**अर्जदारातर्फे वकील**
**श्री.विशाल अनंत मुंडकर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११४०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०८/२०२२

१) श्रीमती.शारदा बालाराम म्हात्रे
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
श्री.दिनेश बालाराम म्हात्रे
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
१ व २ रा.मु.पो.वशेणी, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ यांची आई आहे. अर्जदार नं.१ चे पती म्हणजेच अर्जदार नं.२ यांचे वडील कै.बालाराम लक्ष्मण म्हात्रे हे दि.१६/०८/२०२० रोजी मयत झाले आहेत. सदर मयत बालाराम लक्ष्मण म्हात्रे यांच्या मालकीची मौजे : चाणजे, ता.उरण, जि.रायगड येथील जमीन मिळकत महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर मिळकतीच्या संपादनासंबंधी खालीलप्रमाणे ॲवॉर्ड जाहीर करण्यात आले आहे.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : चाणजे, ता.उरण, जि.रायगड येथील**

| अ. क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | ३/८० | २७ | १ | १४–२–२ |

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत सदर मयत बालाराम लक्ष्मण म्हात्रे यांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारे भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत बालाराम लक्ष्मण म्हात्रे यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१८ माहे जुलै सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# अथर्व लोधी, कुणाल पिंगळे, अक्षय शनमुगम्म रायगड पॉवर लिफ्टींगचे विजेते

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जिल्हा स्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा पनवेल येथे आयोजित करण्यात आलेल्या होत्या. यामधे सब ज्युनिअर, ज्युनिअर, सिनियर,मास्टर अशा विविध गटाच्या स्पर्धा पार पडल्या आहेत. या स्पर्धा रायगड जिल्हा पॉवरलिफ्टीगचे कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल यांचे मार्गदर्शनाखाली व्हि.के.हायस्कूल येथे झालेल्या अतिशय कमी वेळात घेण्यात आल्या आहेत .या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील पेण,खोपोली, माणगाव,उरण, रसायनी या विभागातील जवळ जवळ ५० खेळाडूंनी भाग घेतला होता.

या स्पर्धेत ठाणे जिल्हातील राष्ट्रीय पंच आणि आंतर राष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू देवदत्त भोईर,तसेच प्रा.नवनाथ गायकर, विनायक कारभारी, .सुश्मिता देशमुख, .निलेश भोईर आणि रायगडचे राष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू .माधव पंडित,आणि राज्य खेळाडू .राहुल गजरमल यांनी पंच म्हणून काम केले.तसेच सचिन भालेराव,संदीप पाटकर,शरद रविडोन, विठोबा पांडुरंग पालव यांनी स्पर्धेची व्यवस्था उत्कृष्ट सांभाळली. या स्पर्धेत सब ज्युनिअर गटात पेण येथील संसारे फिटनेस चा कुमार अथर्व लोधी हा विजेता झाला. तर ज्युनिअर स्पर्धेत कुमार कुणाल पिंगळे(बी वाय एफ सी, जिम खोपोली)हा खेळाडू विजेता झाला आणि सीनिअर पुरुष गटात अक्षय शांनमुगम्म (खोपोली, आयरनमिट जिम)हा विजेता झाला. या सर्व विजेत्या स्पर्धकांना यशवंत मोकल, देवदत भोईर ,सचिन भालेराव,संदीप पाटकर,नवनाथ गायकर,रवींद्र जाधव(आर. टी. ओ.विभाग अधिकारी)यांचे हस्ते पदक देऊन सन्मानित करण्यात आले. याचं प्रसंगी रायगडची आशियाई स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडू कू. सलोनी पद्माकर मोरे (महाड),देवदत भोईर,आणि नवनाथ गायकर यांचा यशवंत मोकल यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. या स्पर्धेचे सर्व संचालन अरुण पाटकर यांनी केले.


मा.गोडसे साहेब

**ॲड.पल्लवी मानकर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०९७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०९/२०२२

१) श्रीमती.स्नेहलता रामकृष्ण चिटणीस
वय : ९० वर्ष, व्यव : गृहिणी
रा.फ्लॅट नं.७०५, बी विंग, सातवा मजला,
प्लॉट नं.१९, तनिषा बिल्डींग, से–४,
करंजाडे, पनवेल–४१०२०६
२) वृंदा होनवाड
वय : ५२ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.फ्लॅट नं.७०५, बी विंग, सातवा मजला,
प्लॉट नं.१९, तनिषा बिल्डींग, से–४,
करंजाडे, पनवेल–४१०२०६
३) श्री.शुभनन चिटणीस
वय : ६३ वर्षे, व्यव : नोकरी
रा.फ्लॅट नं.१० ए, सराय जुल्लेना,
डीडीए फ्लॅटस, एस्कोर्टस हार्ट इनस्टिट्यूट
समोर, न्यू फ्रेंडस कॉलनी, दिल्ली ११००२५ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्यापेक्षा मयत कै.रामकृष्ण मुरलीधर चिटणीस यांचा मृत्यू दि.१५/१२/२०१८ रोजी सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल, पनवेल येथे झाला आहे. अर्जदार क्रं.१ या मयत कै.रामकृष्ण मुरलीधर चिटणीस यांच्या पत्नी आहेत. तसेच अर्जदार क्रं.२ ह्या मुलगी व अर्जदार क्रं.२ हे कै.रामकृष्ण मुरलीधर चिटणीस यांचे मुलगा आहेत. अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणसोठी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मयत कै.रामकृष्ण मुरलीधर चिटणीस (५०%)**
**फ्लॅट नं.७०५, बी विंग,**
**सातवा मजला, प्लॉट नं.१९,**
**तनिषा बिल्डींग, से–४, करंजाडे**
**पनवेल–४१०२०६**
**ॲग्रीमेंट व्हॅल्यू–४७,००,०००/–**
**(रक्कम रुपये सत्तेचाळीस लाख)**
**(५०%) हिस्सा–२३,५०,०००/–**
**(रक्कम रुपये तेवीस लाख पन्नास हजार)**
**एकूण क्षेत्रफळ–४६.३६३ चौ.मी., सीबी एरिया ७.८०३ चौ.मी. टेरेस ३.१०५ चौ.मी.**

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजावण्यास असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे.कोर्टात हजर राहून आपली हरकत कळवावी आणि या लेखी नोटीस वरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी हरकत दाखल न केल्यास सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.रामकृष्ण मुरलीधर चिटणीस यांचा वारस घोषित करेल. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मा.कोर्ट अर्जदार यांस वारस प्रमाणपत्र प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नही.

आज दि.२०/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यनिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे साहेब

**ॲड.शेखर खोपकर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१०९३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०८/२०२२

१) श्री.निसार ए कादिर काझी
वय : ७१ वर्षे, धंदा : व्यापार
२) श्री.अब्दुल मजिद अब्दुल कादिर काझी
वय : ५९ वर्षे, धंदा : व्यापार
३) श्री.मोहम्मद सिद्दीकी उर्फ सिद्दीक अ कादिर काझी
वय : ५३ वर्षे, धंदा : व्यापार
४) श्रीमती.रजिया ए कादिर काझी
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
५) श्रीमती.फातीमा ए कादिर काझी
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील अब्दुल काझी उर्फ अब्दुल कादिर काझी उर्फ काजी हे दि.१४/०६/१९८० रोजी मयत झाले आहेत. मृत्यूसमयी मयत अब्दुल काझी उर्फ अब्दुल कादिर काझी उर्फ काजी यांच्या नावे असलेली खालीलप्रमाणेची मिळकत आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल,**
**जि.रायगड येथील सीटी.स.नं.६९४,**
**क्षेत्र २५५.५ चौ.मी.**

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत अब्दुल काझी उर्फ अब्दुल कादिर काझी उर्फ काजी यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभात वारस दाखला प्रदान करण्यात येईल हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.२०/०७/२०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## खोपटा–कोप्रोली रस्त्यावर जीव घेणे खड्डे व साईट पट्ट्या

विभागाच्या अधिकाऱ्यांच्या डोळेझाक कारभारामुळे सध्या पावसाळ्यात रस्त्यावर मोठाले खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे. तरी एन.एच.ऐ.आय.व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर रस्त्याची पाहणी करुन रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे. नाहीतर सदर रस्त्यावर अपघात होऊन नाहक प्रवाशी नागरीक,वाहन चालक यांना आपला जीव गमवावा लागेल अशी भिंती प्रवाशी नागरीक व्यक्त करत आहेत.

## फेसबुक वरुन ऑनलाईन महिलांचे कपडे मागवणे महिलेस पडले चांगलेच महागात

पाठविण्याचा प्रयत्न केला. मात्र, सदर व्यवहार पूर्ण झाला नाही. याच माध्यमातून सायबर चोरट्याने सदर महिलेच्या बँक खात्याची माहिती मिळविली. त्यानंतर सायबर चोरट्याने पुन्हा या महिलेला संपर्क साधून ५ रुपये न पाठविल्यामुळे त्यांचे पार्सल रद्द होईल, अशी भिती दाखविली. त्यामुळे या महिलेने कुरीयरच्या डिलिव्हरी बॉयला ५ रुपये देणार असल्याचे सांगितल्यानंतर त्याने फोन बंद केला. त्यामुळे या महिलेला संशय आल्याने तीने गुगलवरुन एसबीआय कस्टमर केअरचा नंबर शोधून त्यावर संपर्क साधला. तसेच आपले खाते बंद करण्यास सांगितले. मात्र, समोरील महिलेने सर्व्हर डाऊन असल्याचे सांगून या महिलेचे बँक खाते बंद न करता १८ मिनिटे या महिलेचा मोबाईल फोन चालू ठेवून नंतर फोन बंद करुन टाकला. याच कालावधीत सायबर चोरट्याने वेगवेगळ्या युपीआय ट्रान्झेक्शन द्वारे या महिलेच्या खात्यातील १ लाख ६८ हजार रुपये काढून घेतले. सदर प्रकार लक्षात आल्यानंतर या महिलेने न्हावा शेवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## अरुंद रस्त्यामुळे होत आहेत अपघात

हा मार्ग अरुंद असल्याकारणाने व असंख्य वळणे असल्यामुळे या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तरी वेळीच सा.बा. विभागाने लक्ष देऊन हा राहीलेला खाजणी ते घोसाळा १० कि.मी चा रस्ता रुंदीकरण करावा अशी मागणी वाहन चालकांनी व स्थानिक प्रवाशांनी केली आहे.

## पेण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व जागा जिंकणार : धैर्यशिल पाटील

शेकापक्षाने नेहमीच शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या समस्या मोठ्या निष्ठेने सोडविल्या आहेत.तसेच उरणचे आंदेलन, चरीचे आंदोलन, पेणचे सेझचे आंदोलन यामध्ये शेकापने सहभाग घेवुन जनतेला न्याय मिळवुन दिला आहे. पुढील सर्व निवडणुकीत कार्यकर्त्यांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणताच निर्णय घेतला जाणार नाही पुन्हा एकदा तालुका पेटून उठेल विरोधकांना आमची ताकद दाखवून देऊ. असे माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी यावेळी सांगितले

संघटना पक्ष मोठा असून संघटने पेक्षा कोणी मोठा नाही भविष्यात शेतकरी कामगार पक्षाला चांगले दिवस आहेत असे शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा चिटणिस आस्वाद पाटील यांनी सांगितले व त्यांनी वर्धापन दिनाच्या तयारीचा आढावा घेतला व कार्यकर्त्यांना यासंबंधी मार्गदर्शन केले.

## कुलाबा येथील इमारतींच्या पुनर्विकास कामाला गती द्या : ॲड. राहुल नार्वेकर

सचिव भूषण गगराणी, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलींद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष अनिल डिग्गीकर, संरक्षण दलातील वरिष्ठ अधिकारी संदीप मेहता, अरविंद वडेरा आदी वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

विधानसभा अध्यक्ष ड. नार्वेकर म्हणाले, सर्वसामान्य नागरिकांना हक्काचे घर मिळण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. यासाठी नगरविकास विभाग, म्हाडा, मुंबई महानगरपालिका, संरक्षण दलातील वरिष्ठ अधिकारी यांनी बैठक घ्यावी. ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करून या नागरिकांना दिलासा द्यावा. हा प्रश्न मार्गी लागण्यासाठी केंद्रीय संरक्षण मंत्र्यांना स्वत: विनंती करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. नागरिकांच्या घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी नियम आणि वस्तुस्थितीची सांगड घालून संवेदनशिलपणे हा निर्णय घ्यावा, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.

सन १९८० साली कुलाबा येथील सदनिका धारकांना म्हाडा ट्रान्झिस्ट कॅम्पमध्ये स्थलांतरीत करण्यात आले होते. तद्नंतर त्यांचे पुर्नवसन ज्या इमारतींमध्ये करण्यात आले त्या इमारती जी+७ असून, त्या इमारतींना नियोजन प्राधिकरणाकडून ३ मजले पर्यंतच ओ.सी. प्राप्त झाले असल्याने केवळ ३ मजल्यापर्यंतच त्यांचे स्थलांतरण झाले असल्याने, या समस्येवर तत्काळ तोडगा काढून सुमारे २१० रहिवाशांचे तत्काळ पुनर्वसन करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी निर्देश देण्यात आले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# फौजदार जितेंद्र वाटवे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

नुकतेच पोलीस दलात स्वकर्तृत्वाने बढती मिळविलेले, ९ मे १९६८ रोजी जन्मलेले एक परोपकारी, रुबादार, पोलीस अधिकारी, खाकी वर्दीतील देवमाणुस, पोलीस फौजदार जितेंद्र वाटवे यांना बुधवार दि.२० जुलै २०२२ रोजी सकाळी ०४.०० वाजता त्यांचे वाकडाई नगर उतेखोल माणगांव येथिल निवासस्थानी अचानक छातीत दुखु लागल्याने माणगांव क्रिटीकेअर हॉस्पीटल मध्ये तातडीने दाखल करण्यात आले असता हृद्यविकाराच्या तिव्र झटक्याने त्यांचे वयाच्या अवघ्या ५४ व्या वर्षी निधन झाले आहे.



माणगांवकरांमध्ये सुपरिचित जितु वाटवे आपल्या कर्तव्यदक्षतेने साधा शिपाई ते पोलीस उपनिरिक्षक पदी बढती मिळवत, सध्या माणगांव पोलीस दलात कार्यरत होते. सुसंस्कृत मितभाषी पण जनतेशी सहज संवाद साधणारे, हुशार, देखणे व्यक्तिमत्व आज नियतीने निमीत्त मात्र हृद्य-विकाराच्या तीव्र धक्याने आपल्यातुन हिरावुन नेल्याचे आज सकाळीच कानी पडलेल्या दुर्दैवी वृत्ताने, सर्व मित्र परिवार माणगांवकरांमधुन प्रचंड दुःख, हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

अनेकांनी अनावर झालेल्या भावना व्यक्त करताना जितु वाटवे यांना सोशल माध्यमांवर भावपूर्ण श्रध्दांजली वाहिल्या आहेत. वृत्त समजताच माणगांव मधिल शासकिय कर्मचारी, लोकप्रतिनीधी नगराध्यक्ष, नगरसेवक, पोलीस तसेच सर्वसामान्य जनतेने अंत्यदर्शनासाठी वाकडाई नगर येथे धाव घेतली. जितेंद्र वाटवे यांच्या पश्चात त्यांचा एकुलता एक मुलगा साहिल व शिक्षिका असलेली सुविद्य पत्नी तसेच एक भाऊ असा परिवार आहे. माणगांव पोलीसांना या दुःखद घटनेमुळे प्रचंड धक्का बसला असुन आपला सहकारी असा अचानक गेल्याचे अतिव दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

## खड्ड्यांविरोधात मनसे आक्रमक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल परिसरातील खड्ड्यांविरोधात मनसेने अनोखे आंदोलन करून खड्ड्यात चहा बनवून सिडको अधिकाऱ्यांना पाजन्याचा प्रयत्न केला आहे.

पनवेल महानगरपालिका परीक्षेत्रामध्ये रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. याकडे पालिका प्रशासन आणि सिडको प्रशासन यांचे कोणतेही लक्ष नसल्याने नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे अनेक वेळा अपघात होतात. यात काहींना अपंगत्व येते. याची दखल घेत पनवेल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने एक अनोखे आंदोलन करण्यात आले. नवीन पनवेल सिडको कार्यालयाबाहेर खड्ड्यामध्ये चहा बनवून ती सिडकोच्या अधिकाऱ्यांना पाजण्यात आली. यावेळी पनवेल शहर मनसेचे योगेश चिले, पराग ब्लड, अतुल चव्हाण, अनिकेत मोहिते व कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे जाऊन जर याबाबत सिडकोने गांभीर्याने दखल घेऊन येथील रस्ते सुधारले नाहीत, तर सिडकोच्या कार्यालयात जाऊन चहा बनवून पाजू असा इशाराच यावेळी मनसे कडून देण्यात आला आहे.

## सुनिल गायकवाड यांना निरोप तर दिघीकर यांचे स्वागत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पंचायत समिती म्हसळा चे ग्रामपंचायत विस्तार अधिकारी सुनिल गायकवाड यांची बदली रोहा पंचायत समिती मध्ये आणि श्रीवर्धन पंचायत समितीचे ग्रामपंचायत विस्तार अधिकारी डी. एन.दिघीकर यांची म्हसळा पंचायत समिती मध्ये झाल्याने गायकवाड यांना निरोप तर दिघीकर यांचे स्वागत कार्यक्रम म्हसळा पंचायत समितीच्या सभागृहात संपन्न झाला. या प्रसंगी गटविकास अधिकारी पोळ, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीम. कळम्बासकर, पंचायत समिती कृषी अधिकारी मंगेश साळी, कक्ष अधिकारी हेमंत माळी, अशोक बाक्कर, चौधरी, परकाळे, अकाउंट शाखेचे कळबासकर, श्रीम. अलंका, मच्छिन्द्र पाटील, सर्व अधिकारी कर्मचारी वर्ग, ग्रामविकास अधिकारी, सर्व ग्रामसेवक, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येनें उपस्थित होते. सुनिल गायकवाड यांनी गेली तीन वर्ष म्हसळा तालुक्यात अहोरात्र मेहनत करून शासनाच्या अनेक योजना यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. त्यांनी या तालुक्यात केलेल्या कामा बद्दल सर्व अधिकारी कर्मचारी यांनी आपापल्या मनोगतामध्ये व्यक्त केले.

---

वाळीव साहेब

**ॲड.अनिल सुभाष जाधव**

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१२६/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.२१/०९/२०२२

सौ.सरिता निलेश म्हात्रे
उर्फ कु.सरिता कान्हा नवाळे
वय : ३७, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१२५-८८ ब, चिर्ले गाव,
ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

१) ज्याअर्थी अर्जदार यांची आई कै.जयवंती कान्हा नवाळे ही दि.०२/१२/२०२१ रोजी मौजे : चिर्ले, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाली आहे. तसेच अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. तसेच अर्जदारांशिवाय कै.जयवंती कान्हा नवाळे यांना कोणीही वारसदार नाहीत.

२) कै.जयवंती कान्हा नवाळे यांच्या उरण येथील एम.आय.डी.सी.मध्ये सफाई कामगार सेवा अगर कामाबाबत व येणारा निर्वाह निधीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस सक्सेशन सर्टीफिकेट / वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस सक्सेशन सर्टीफिकेट / वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरच्या अर्जात नमूद केलेल्या सेवा अगर कामाबाबत अगर येणारा निर्वाह निधी बाबत कै.जयवंती कान्हा नवाळे यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळण्याकरिता सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

३) त्याअर्थी सदर वर दाखल अर्जास कै.जयवंती कान्हा नवाळे यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने सक्सेशन सर्टीफिकेट / वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस सक्सेशन सर्टीफिकेट / वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१९/०७/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

---

### तहसीलदार पनवेल यांचे न्यायालयात

क्र.कुळ कायदा कलम ७० ब केस क्र.४/२०१८

प्रति,
१) श्री.भगवान गणपत पाटील
२) श्री.वसंत गणपत पाटील
३) लहू गणपत पाटील
४) जयवंत गणपत पाटील
रा.चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.दत्त मंदिर, पनवेल
व शंकर तुकाराम घम
रा.चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

सामनेवाले यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद केलेल्या प्रश्नाधीन मिळकतीबाबत अर्जदार यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७० ब अन्वये कुळ निश्चित करून मिळणेकामी दावा दाखल केलेला आहे. त्याअनुषंगाने प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. तदनंतर प्रस्तुत दाव्यामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र प्रस्तुत प्रकरणातील सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. यास्तव सदर दाव्याची पुढील सुनावणी निम्नस्वाक्षरीतांच्यासमोर दि.२९/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय पनवेल यांचे कार्यालय, साईनगर, तलाठी प्रशिक्षण केंद्र, पनवेल, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब, या जाहीर नोटीसीद्वारे अर्जदार व सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकतीशी हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी दि.२९/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दावा जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे चिंध्रण, ता.पनवेल | १२६/0 | २.१२.0 | ३२.७६ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/०७/२०२२

**सही/-**
**तहसीलदार, पनवेल**

---

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी/ करारनाम्याशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **नोड - कामोठे** | | | | | | | | |
| १ | ५२ कामोठे | कामाठे २१९ | १२/५<br>२०७/११<br>२०९/४<br>२०९/१०<br>३५४/२<br>३६०/१०<br>१८५/७<br>१८८/३<br>१८९/७<br>१९८/१२ | ०-२८-०<br>०-०४-५<br>०-१७-७<br>०-४३-६<br>०-१६-४<br>०-०३-०<br>०-०५-३<br>०-०३-८<br>०-०२-०<br>०-१४-५ | १६०० चौ.मी. पैकी ५० चौ.मी. व १३५ चौ.मी. | मौजे-कामोठे, भूखंड क्र. ५A, सेक्टर-२४, क्षेत्र-४९.४५ चौ.मी. व भूखंड क्र. ६२A, सेक्टर-१०, क्षेत्र-१३५.०२ चौ.मी. | मा. न्यायालयिन रे.मु.क्र. ८५/२००२ व रे.मु.क्र. १७९/२०११ च्या तडजोड पुरशीनुसार भुधारक गोवऱ्या गोमा गोवारी यांना इरादित करण्यात आला आहे व मा. न्यायालयीन रे.मु.क्र. ८२/२००२ व रे.मु.क्र. १७९/२०११ व रे.मु.क्र. २३७/२०२० च्या तडजोड पुरशीनुसार वारसदाखल्यानूसार भुधारक कै. भरत गोमा गोवारी यांचे वारस<br>१. श्रीमती जयवंती भरत गोवारी<br>२. श्री. विरेश भरत गोवारी<br>३. श्री. निलेश भरत गोवारी | निरंक |
| | २६० कामोठे | कामाठे ९४ | २१३/३ | ०-५२-७ | | | | |
| | | | **एकूण संपादित क्षेत्र** | **१-९१-५** | | | | |
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| २ | तळोजा १३२ | २३५/२५० | २५४/१ब + २ब | ०-२८-९ | ३५५० चौ.मी. | भूखंड क्र. १, सेक्टर-१९, क्षेत्र ३२५३.२९ चौ.मी. | **१. कै. काळु नथु चौधरी (मयत) यांचे वारस**<br>**१) कै. तुळशिराम काळू चौधरी (मयत) यांचे वारस**<br>१.१) श्रीमती काळुबाई तुळशिराम चौधरी<br>१.२) श्री. यशवंत तुळशिराम चौधरी<br>१.३) श्री. अंकुश तुळशिराम चौधरी<br>१.४) श्री. सुभाष तुळशिराम चौधरी<br>१.५) श्रीमती चंद्रा बाळाराम ठाकुर<br>१.६) श्रीमती मंजुळा संतोष पाटील<br>१.७) श्रीमती लता जगदीश भोईर<br>२) धर्मा काळू चौधरी<br>३) ज्ञानदेव काळू चौधरी<br>४) मथूबाई काथोर चौधरी (मयत)<br>५) रामदास काथोर चौधरी<br>६) पांडुरंग काथोर चौधरी<br>७) अशोक काथोर चौधरी<br>**८) कै. भगवान काथोर चौधरी (मयत) यांचे वारस**<br>८.१) श्रीमती रंजना भगवान चौधरी<br>८.२) श्री. मनोज भगवान चौधरी<br>८.३) श्री. अक्षय भगवान चौधरी<br>९) चंद्रभागा सावळाराम कडु<br>१०) ठकाबाई बाळाराम चौधरी<br>११) लक्ष्मीबाई सुरेश शेळके<br>१२) उदय बाळाराम चौधरी<br>१३) सुवर्णा शशिकांत चौधरी<br>१४) रुशिकेश शशिकांत चौधरी<br>१५) सिमा शशिकांत चौधरी<br>१६) गिता उत्तम गायकर<br>१७) विदया नितीन कडू<br>१८) साखरुबाई दत्ता उर्फ दत्तात्रेय चौधरी<br>१९) सुनिल दत्ता उर्फ दत्तात्रेय चौधरी<br>२०) सुरेंद्र दत्ता उर्फ दत्तात्रेय चौधरी<br>२१) सरिता रमेश खानावकर<br>२२) सुमित्रा मोहन पाटील | निरंक |
| | | १०७ | २४५/० <br>२४८/३<br>२५९/१ | २-५९-०<br>०-४०-५<br>०-७९-९ | | | | |
| ३ | तरघर १३४९ | ७४ | ९८/३ | ०-६४-८ | एकूण मंजूर पात्रता ५५० चौ.मी. पैकी १५० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. २१९ बी, सेक्टर-१९, क्षेत्र १५० चौ.मी. | **१) कै. पांडुरंग उर्फ पांडु हिरु कोळी (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. बाळाराम पांडुरंग कोळी<br>२) श्री. तुकाराम पांडुरंग कोळी<br>**३) कै. दुकल्या पांडुरंग उर्फ पांडु कोळी (मयत) यांचे वारस**<br>अ) श्री. शरद दुकल्या कोळी | |
| | | | **एकूण** | **०-६४-८** | | | | |
| ४ | रोडपाली ३१९ | ३/५ रोडपाली | ७०/३ | ०-०९-४ | ५००० चौ.मी. | रोडपाली (कळंबोली) नोड येथील भुखंड क्र. ४१ ते ४६, सेक्टर-१६ क्षेत्र-४५४०.७२ चौ.मी. | **मुळ भूधारक कै. त्रिंबक जोमा ठाकूर (मयत) यांचे वारस**<br>**कै. मुक्ताबाई त्रिंबक ठाकूर (मयत)**<br>**कै. आत्माराम त्रिंबक ठाकूर(मयत)**<br>१) यशवंत आत्माराम ठाकूर<br>२) रविंद्र आत्माराम ठाकूर<br>३) विश्वजित आत्माराम ठाकूर<br>४) संतोष आत्माराम ठाकूर<br>५) शिरिष आत्माराम ठाकूर<br>६) सचिन आत्माराम ठाकूर<br>७) कै. दशरथ त्रिंबक ठाकूर (मयत)<br>७.१) सौ. अंजली निलेश पाटील<br>७.२) सौ. वैशाली गणेश पाटील<br>७.३) सौ. कविता विनायक मुंबईकर<br>७.४) सौ. रश्मी सुनिल बांधनकर<br>७.५) सौ. सीमा आशीष पाटील<br>७.६) श्री. चेतन दशरथ ठाकूर<br>८) किसन त्रिंबक ठाकूर<br>९) प्रभाकर त्रिंबक ठाकूर<br>१०) भारती भास्कर पाटील<br>११) चंद्रभागा तुकाराम म्हात्रे<br>१२) सुलोचना उर्फ सुनिता मोहन म्हात्रे<br>१३) आशा विश्वनाथ पाटील<br>१४) अनंता नारायण ठाकूर | |
| | | ३(१७) रोडपाली | ४१०/५ | ०-१९-० | | | | |
| | | २०/१ रोडपाली | ११८/०<br>१२८/०<br>१७०/२ | ०-३१-०<br>०-२६-१<br>०-२३-३ | | | | |
| | | ५८ रोडपाली | ७७/० | ०-२९-१ | | | | |
| | | ६२ रोडपाली | १५४/० | ०-१४-७ | | | | |
| | | ९४ आंबेतखार | ४३७/१ | ०-२३-३ | | | | |
| | | ९४ आंबेतखार | ४३७/७३ | ०-२५-३ | | | | |
| | | १०८ रोडपाली | ५४/० | ०-२२-५ | | | | |
| | | ११२ रोडपाली | ८६/१(२) | ०-१८-२ | | | | |
| | | १३२ रोडपाली | ४०४/१ | ०-०३-५ | | | | |
| | | ५८ रोडपाली | ५५/२(१)पै | ०-३९-९ | | | | |
| | | २४ रोडपाली | १५३/० | ०-२४-० | | | | |
| | | १०८ रोडपाली | २९८/० | ०-२४-८ | | | | |
| | | ३वाय रोडपाली | ७०/१/१ | ०-११-५ | | | | |
| | | १०० रोडपाली | ३६२/१/१ | ०-०६-३ | | | | |
| | | १३२ आंबेतखार | ४३७/१८ब | ०-४०-० | | | | |
| | | ३अ(२४) रोडपाली | ७६/१/१ | ०-२९-८ | | | | |
| | | २०/२ रोडपाली | १७७/०पै | १-२०-२ | | | | |
| | | १००ब रोडपाली | ३६२/३ | ०-०५-० | | | | |
| | | ९३ रोडपाली | ३२७/१ | ०-२४-२ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, सबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र/करारनामा करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/१६८/२०२२-२३

